**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२८/०७/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका
क्रीडा विभाग

***दहीहंडी उत्सवानिमित्त गोविंदांना महानगरपालिकेकडून १० लाखांचे विमा संरक्षण;***
***मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दहीहंडी उत्सवासंदर्भात बैठक संपन्न***

दहीहंडी उत्सवात भाग घेणाऱ्या गोविंदांना महानगरपालिकेतर्फे विमा संरक्षण देणे, तसेच नियमांचे पालन करून दहीहंडी उत्सव साजरा करणे, तसेच दहीहंडी उत्सवासंदर्भातील विविध विषयांबाबत चर्चा करणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिका, क्रीडा विभागामार्फत माननीय महापौर महोदय श्री.अजीव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२८/०७/२०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयात गोविंदा पथक, दहिहंडी उत्सव आयोजक, स्थानिक पोलिस विभाग, वाहतुक विभाग, महावितरण विभाग, अग्निशमन विभाग व इतर अन्य विभागासमवेत संयुक्त बैठक संपन्न झाली.
मा.उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी बैठकीच्या सुरुवातीस मागील वर्षी महानगरपालिकेमार्फत गोविंदा पथकांना देण्यात आलेल्या विमा संरक्षण बाबत माहिती दिली. मागील वर्षी विमा संरक्षण मिळणे कामी महानगरपालिकेत नोंदणी केलेल्या सुमारे ९९ गोविंदा पथकांना महानगरपालिकेने इन्शुरन्स कंपनी मार्फत १० लाखांपर्यंत विमा संरक्षण काढून दिलेले होते. ९९ गोविंदा पथकांमध्ये एकूण ६६५२ गोविंदांचा समावेश होता. यावर्षीही याचप्रमाणे विमा संरक्षण देण्यात येणार असून सर्व दहीहंडी आयोजकांनी मा.न्यायालयाने व शासनाने दिलेल्या नियमांनुसार तसेच सर्व संबधित विभागाच्या परवानगी घेवूनच उत्सवाचे आयोजन करावे. आयोजकांना उत्सवाचे आयोजन करणे कामी एकाच ठिकाणी विविध शासकीय विभागांच्या परवानग्या प्राप्त होणेकामी महानगरपालिकेमार्फत लवकरच ‘एक खिडकी योजना’ सुरु करण्यात येईल. गोविदांना विनामुल्य विमा देण्यात येत असून विमा योजनेचा तात्काळ व विनाअडचण लाभ देणेकामी गोविंदा पथकांनी विमा संबंधी दिलेला फॉर्म योग्यरित्या भरावा व आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडून लवकरात लवकर प्रभाग समिती कार्यालय अथवा मुख्यालय येथे जमा करावा. जरी महानगरपालिकेमार्फत विमा संरक्षण देण्यात येत असले तरी आयोजकांनी उत्सवाच्या ठिकाणी सर्व सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात. उत्सवाच्या ठिकाणी विशेषतः महिला गोविंदा पथकांसाठी शक्य तितके मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात येईल असे मा.उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सांगितले.
या बैठकीस उपस्थित सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.गीते यांनी उपस्थितांशी बोलताना सांगितले कि, प्रत्येक उत्सव सुरक्षितरित्या साजरे केले जावेत यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून नागरिकांचेही तेवढेच सहकार्य अपेक्षित आहे. दहीहंडी उत्सव साजरा करताना आयोजकांनी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना कराव्यात, रस्त्यावर गर्दी होवून वाहतुकीस तसेच नागरिकांना येण्या-जाण्यास अडथळा निर्माण होवू नये यासाठी उपाययोजना करावी, मंडपाच्या जागा सुनिश्चित करून त्या रस्त्यावर येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. गर्दीचे नियोजन होण्याच्या दृष्टीने आयोजकांनी आपले स्वयंसेवक त्या ठिकाणी नेमून त्यांना ओळखपत्र द्यावीत जेणेकरून पोलिसांना त्यांच्याशी समन्वय साधून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. तसेच सर्वांनी वेळेच्या बंधनाचे पालन करावे, आवश्यक त्या परवानग्या घ्याव्यात, उत्सव साजरा करताना कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे उत्सवात लावले जाणारे बॅनर्स, प्लेक्स, जाहिरातीचे फलक इ.ची रीतसर परवानगी घेवूनच ते लावावेत, तसेच त्यावरील संदेशामुळे कोणत्याही प्रकारची तेढ निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच डी.जे. साऊंड इ.मुळे ध्वनीप्रदूषण होणार नाही याबाबत काळजी घेण्यात येऊन त्यावर अश्लील गाणी लावू नयेत.
बैठकीस उपस्थित महाराष्ट्र राज्य दहीहंडी असोसिएशनच्या सचिव श्रीम.गीता झगडे यांनी उपस्थितांना दहीहंडी

उत्सवासंदर्भात विविध प्रकारची माहिती दिली. दहीहंडी उत्सवात गोविंदांना विनामुल्य विमा संरक्षण देणारी वसई विरार शहर महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका असल्याचा उल्लेख करीत महानगरपालिकेच्या या प्रोत्साहनामुळे दहीहंडी पथके उत्साहाने या साहसी खेळात भाग घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

महावितरण विभागाच्या वतीने ही आयोजकांना सूचना देण्यात आली कि, दहीहंडी ची उभारणी विद्‍युत वाहिन्यांच्या जवळ नसावी ती सुरक्षित अंतरावर उभारावीत तसेच उत्सवावेळी लागणारे विजेचे अधिकृत कनेक्शन घ्यावीत जेणेकरून कोणताही अपघात होणार नाही.

यावेळी उपस्थित सन्माननीय नगरसेवकांनीही आपल्या सूचना बैठकीत मांडल्या. शक्य असल्यास उत्सवाच्या ठिकाणी ठिकाणी रुग्णवाहिका ठेवणेच्या सूचना यावेळी आयोजकांना करण्यात आल्या. तसेच उपस्थित आयोजकांनीही त्यांच्यामार्फत करण्यात येणाऱ्या आयोजनाविषयी माहिती देऊन त्यांना येणाऱ्या अडचणी यावेळी सांगितल्या.

बैठकीत मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी दहीहंडी उत्सव साजरा करताना आयोजकांनी सर्व शासकीय व इतर आवश्यक परवानग्या घेऊनच व शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करूनच आयोजन करावे असे सांगत महानगरपालिकेच्या 'एक खिडकी' योजनेच्या माध्यमातून या परवानग्या आवश्यक कागदपत्र सादर करून घ्याव्यात. महानगरपालिकेकडून या उत्सवासाठी विमा संरक्षण देण्यासोबतच महानगरपालिकेचे वैद्यकीय विभाग, अग्निशमन विभाग, घनकचरा विभाग इ.सोबत संपूर्ण प्रशासन तत्पर राहणार असून आयोजकांनी व गोविंदा पथकांनीही नियमांचे पालन करून उत्साहात हा सुरक्षितरित्या हा उत्सव साजरा करावा.

मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील यांनी उपस्थितांना संबोधताना सांगितले कि, दहीहंडी उत्सव साजरा करतेवेळी थर लावताना शेवटच्या थरावरील गोविंदाला सुरक्षेच्या दृष्टीने सेफ्टी बेल्ट लावणे, थर पडून गोविदांना दुखापत होऊ नये यासाठी खाली मॅट लावणे, प्राथमिक वैद्यकीय सुविधा आयोजकांनी कराव्यात.

यावेळी मा.महापौर महोदय श्री.अजीव पाटील महोदयांनी सांगितले कि, महानगरपालिकेमार्फत गोविंदा पथकांना विनामुल्य विमा देण्यात येत असून पथकांनी संबंधित विभागाशी संपर्क करून लवकरात लवकर आपली नोंदणी करून घ्यावी. सर्व आयोजकांनी मा.न्यायालय व शासनाने दिलेल्या नियमानुसारच उत्सव साजरा करावा, गोविंदाना कोणत्याही प्रकारची दुखापत होवू नये यासाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना आयोजकांनी कराव्यात, १४ वर्षाखालील मुला-मुलींचा समावेश गोविंदा पथकात करू नये, वाहतूक कोंडी होवू नये यासाठी शक्यतो मुख्य रस्त्यावर उत्सवाचे आयोजन करणे टाळावे, ध्वनी नियंत्रणात ठेवावा, कार्यक्रमाच्या वेळेचे बंधन पाळावे. त्याचप्रमाणे जे गोविंदा पथकांना सदर दिवशी जेवणाची सोय हवी असेल त्यांनी जीवदानी देवी मंदिर संस्थानाशी संपर्क करावे. उत्सवावेळी महानगरपालिकेचे संपूर्ण सहकार्य राहणार असून विशेषतः वैद्यकीय आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग हे नेहमीच तत्पर असतील. उत्सवाच्या ठिकाणा जवळील खाजगी रुग्णालयांनाही उत्सवावेळी सतर्क राहण्याचे व आपत्कालीन परिस्थितीत सहकार्य करण्याचे कळविण्यात येणार आहे. नागरिकांनीही यावेळी सहकार्य करून हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन यावेळी मा.महापौर महोदयांनी केले.

या वेळी व्यासपीठावर मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, मा.माजी महापौर श्री.रुपेश जाधव, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, परिवहन व्यवस्थापक श्री.धेर्यशील जाधव, उप-आयुक्त(क्रीडा) श्री.अजित मुठे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. गीते, महाराष्ट्र राज्य दहीहंडी असोसिएशन अध्यक्ष श्री.बाळा पडेलकर उपस्थित होते. तसेच या बैठकीस महानगरपालिकेचे मा.नगरसेवक-नगरसेविका, महानगरपालिकेचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी, पत्रकार, दहीहंडी उत्सव आयोजक, विविध गोविंदा पथकांचे प्रतिनिधी इ.उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर यांनी केले.

क्रीडा विभाग,<br>
वसई विरार शहर महानगरपालिका